# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २१/०७/२०२६ (मंगळवार )

## अपर पोलीस अधीक्षक ,नागपुर ग्रामीण यांनी जलालखेडा पोलीस स्टेशन अंतर्गत अंबाडा येथे ग्रामस्थांची बैठक घेतली, अवैध दारूबंदीसाठी जनसहभागाचे आवाहन केले

दिनांक २१/०७/२०२६ रोजी श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी जलालखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील अंबाडा गावास भेट देऊन ग्रामपंचायत अंबाडा येथे ग्रामस्थांची दारूबंदीबाबत जनजागृती बैठक घेतली. गावातील अवैध हातभट्टी दारूची निर्मिती, वाहतूक व विक्री पूर्णपणे बंद करण्यासाठी ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घ्यावा तसेच अवैध व्यवसायांविरोधात पोलीसांना सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

सदर बैठकीत श्री. अनिल मस्के यांनी अवैध दारूमुळे समाजावर होणारे सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक दुष्परिणाम याविषयी मार्गदर्शन केले. अवैध दारूची निर्मिती, वाहतूक किंवा विक्रीबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास ती तात्काळ पोलिसांना कळवावी असे सांगितले.यानंतर अंबाडा गावात कोणीही अवैध हातभट्टी दारूची निर्मिती, साठवणूक, वाहतूक अथवा विक्री करताना आढळल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल तसेच अवैध दारू व्यवसायासह इतर कोणत्याही बेकायदेशीर व्यवसायात सहभागी असलेल्या सराईत आरोपींविरुद्ध हद्दपार आणि एमपीडीए अंतर्गत स्थानबद्धता तसेच कायद्यानुसार इतर प्रभावी आणि कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. तसेच ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणुन घेतल्या.गावात शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस व नागरिकांनी समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन केले.

सदर बैठकीस श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्यासोबत श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग आणि सपोनि श्री पवन भांबुरकर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन जलालखेडा उपस्थित होते.






# घरफोडीचे ५ गुन्हे उघड, २ आरोपी अटक, १ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान :—** मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री संतोष गायकवाड यांच्या मार्गदर्शनात दिनांक २०/०७/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मांडवधरे, प्रभारी अधिकारी , कन्हान पोलीस स्टेशन यांच्या नेतृत्वात कन्हान पोलीसांनी सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण यांच्या सहकार्याने तांत्रिक विश्लेषण, तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून घरफोडीचे/ दुकानफोडीचे ४ गुन्हे आणि जबरी चोरी चा १ गुन्हा असे एकुण ५ गुन्हे उघड केले आहे.

पोलीस स्टेशन कन्हान नागपुर ग्रामीण येथील दि. १२/०७/२०२६ रोजी मौजा न्यु गोंडेगाव येथील फिर्यादी नामे किशोर सुरेश गुरव यांचे किशोर ज्वेलर्सचे दुकानाचे शटर तोडुन सोने चांदी चे दागीने चोरी केल्या च्या तक्रारी वरून पोस्टेला अप क्र ४४०/२६ कलम ३०५(अ),३३१(४) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान दिनांक २०/०७/२०२६ रोजी कन्हान पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, कामठी रेल्वे स्टेशन येथुन आरोपी क्र **१) गौरव उर्फ तेलानी राजु राउत, वय २१ वर्षे, रा. अशोक नगर, कन्हान** आणि त्याचेसोबत एक विधीसंघर्षग्रस्त बालक हे दोघे डोंगरगड येथे रेल्वेने पळुन जाण्याच्या तयारीत आहे. कन्हान पोलीसांनी तत्काळ त्यांना कामठी रेल्वे स्टेशन येथुन ताब्यात घेतले. त्यांच्याकडे गुन्ह्याबाबत कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी त्याच्या आणखी एका साथीदार आरोपी क्र. २) **साहिल किशोर लांजेवार, वय २१ वर्षे, रा. बुध्द नगर जरीपटका नागपुर याचेसह मिळुन** कन्हान आणि नागपुर शहर येथे दुकानफोडी तसेच घरफोडीचे गुन्हे केले असल्याची माहीती दिली. आरोपी क्र २) यांना खापरखेडा येथुन ताब्यात घेण्यात आले असुन **दोन्ही आरोपी यांना अटक केले आहे.**

**पोलीसांनी पंचासमक्ष सदर गुन्हयात चांदी सदृश्य ऐवज किंमती १,५०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**उघड झालेले गुन्हे**

**१) पोस्टे कन्हान अप. क्र. ४४०/२६ कलम ३०५(अ),३३१(४) भान्यासं**

२) पोस्टे कन्हान  अप. क्र. ४४३/२६ कलम ३०५(अ),३३१(४) भान्यासं
३) पोस्टे कन्हान  अप. क्र. ४१८/२६ कलम ३०५(अ),३३१(४) भान्यासं
४) पोस्टे कन्हान  अप. क्र. ४१५/२६ कलम ३०५(अ),३३१(४) भान्यासं
५) पोस्टे कोराडी अप. क्र. २७८/२६ कलम ३०९(४) भान्यासं





## जानेवारी २०२६ पासून बेपत्ता असलेल्या अल्पवयीन बालिकेचा पारशिवनी पोलिसांनी लावला शोध

मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या मार्गदर्शनाखाली, सपोनि श्री. किशोर शेरकी, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पारशिवनी यांच्या नेतृत्वाखाली पारशिवनी पोलीसांनी कौशल्यपूर्ण तपास करून जानेवारी २०२६ पासून बेपत्ता असलेल्या अल्पवयीन मुलीचा शोध घेतला आहे.

दिनांक ०१/०१/२०२६ रोजी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे दाखल अपहरण गुन्हा क्र. ०१/२०२६, कलम १३७ (२) भारतीय न्याय संहिता मधील बेपत्ता अल्पवयीन मुलगी, वय १६ वर्षे ९ महिने हिचा शोध घेण्यासाठी विशेष पथक नेमण्यात आले होते. तपासादरम्यान विविध तांत्रिक बाबींचा तसेच गोपनीय माहितीच्या आधारे पोलीसांनी सातत्याने शोधमोहीम राबविली. दिनांक २०/०७/२०२६ रोजी पारशिवणी पोलीसांनी सदर अल्पवयीन मुलीचा यशस्वी शोध घेवुन तिला कामठी परीसरातुन सुरक्षित ताब्यात घेण्यात आले आहे.

## हद्दपार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक २०/०७/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रमीण यांचे पथक सावनेर उपविभागात पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतून हद्दपार करण्यात आलेला आरोपी **उजागरसिंग धरमसिंग अंधरेले, वय ५९ वर्षे, रा. वार्ड क्र. १५, तिखे लेआउट, सरदार मोहल्ला, कळमेश्वर, जि. नागपूर** हा आपल्या राहत्या घरी आला आहे.

प्राप्त माहितीच्या आधारे पोलीस पथकाने तात्काळ तिखे लेआउट, सरदार मोहल्ला, कळमेश्वर येथे जाऊन पाहणी केली असता सदर आरोपी हा त्याच्या राहत्या घरी आढळून आला. नमुद आरोपी याने कोणीतीही कायदेशिर परवानगी न घेता हद्दपारी आदेशाचे उल्लंघन

केल्याने पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे आरोपीविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०४ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. बुटीबोरी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :— दिनांक २०/०७/२०२६ रोजी बुटीबोरी पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा रेंगापार शिवार येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) मुकेश परमेश्वर घोंगडे, वय ३२ वर्षे, रा. वार्ड क्र. ४, बुटीबोरी २) करण बाजीराव खरकाटे, वय २४ वर्षे, रा. बुटीबोरी ३) गजानन शहादेव कायंदे, वय ५५ वर्षे, रा. वार्ड क्र. २, फ्रेंन्डस कॉलनी बुटीबोरी ४) देवानंद नारायण पाटील, वय ५२ वर्षे, रा. गोदावरी नगर, बुटीबोरी यांना जागीच पकडले.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि नगदी २८२०/—रूपये असा एकुण २८२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद ०४ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १५ गुन्हे नोंद

दिनांक २०/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, इतर साहित्य, देशी दारू असा एकुण ४१,९००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे अनिल खेमसिंग चव्हान, वय ३४ वर्ष, रा. चाकडोह याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा येथे** आरोपी नामे १) दिनेश मारोतराव उभाळे, वय ४२ वर्ष, रा. तारा, ता. नरखेड २) अरविंद मारोतराव उभाळे, वय ४४ वर्ष, रा. तारा, ता. नरखेड यांचेवर १ गुन्हा नोंद, तसेच भिमराव महोदव कावळे, वय ५१ वर्ष, रा. तारा सावंगा, ता. आष्टी, जि. वर्धा याचेवर १ गुन्हा नोंद, आरोपी अरविंद मारोतराव उभाळे, वय ४४ वर्ष, रा. तारा, ता. नरखेड याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी विलास तुलाराम चाचरकर, वय २२ वर्ष, रा. वार्ड क्र. २, कुही त. कुही याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे** १) आरोपी नामे करणसिंग उजागरसिंग अंधरेले, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र. १५, सरदार मोहल्ला कळमेश्वर २) युवराजसिंग कपुरसिंग अंधरेले, वय २० वर्ष, रा. वार्ड क्र १५, सरदार मोहल्ला, कळमेश्वर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी बादल रवि राउत, वय १९ वर्ष, रा. केळवद, वार्ड क्र. २ याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी १) अभीनाथ जगन्नाथ डोंगरे, वय ५५ वर्ष, रा. सिंदेवानी २) महिला आरोपी यांचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे राजकुमार उत्तम लहानुकुथे, वय ४० वर्ष, रा. अजनगाव, ता. मौदा याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे १) विलास रमेश ईटणकर, वय ३३ वर्ष, रा.राजाजी वार्ड, रामटेक २) विलास मधुकर आंबाकडे, वय ५५ वर्ष, रा. बनपूर, ता. पारशिवणी, जि. नागपूर ३) महिला आरोपी यांचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बेला** आरोपी नामे नितिन भिमराव बढीये, वय ३६ वर्षे, रा. पिपरा, ता. उमरेड, जि. नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ३६०० मिली देशी दारू, १३१ लिटर मोहाफुल दारू, ५१० लिटर मोहाफुल सडवा, इतर साहित्य असा एकुण ४१,९००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७०७ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २१/०७/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७०७ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे २८ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३२ आरोपी अशा एकुण ९० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २० आणि पोलीस स्टेशन वेलतुर २७ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १३४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ६० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १५ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी अशा एकुण १३७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २० आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १६ आरोपी अशा एकुण ६९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २५ आरोपी अशा एकुण ११२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५९ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २५ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४८ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे  ३३ आरोपी अशा एकुण १६५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.








मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने